# हिंगोली जिल्हा पोलीस वार्तापत्र

## पोलीस अधीक्षक कार्यालय,हिंगोली.

## दिनांक ३०.११.२०२२

**अवैध वाहतुक करणारे व वाहतुक नियमांचे उल्लंघन करणारे वाहन चालकावर कार्यवाही :—**

मा.पोलीस अधीक्षक हिंगोली यांचे मार्गदर्शनाखाली हिंगोली जिल्हयात दि. २९/११/२०२२ रोजी अवैध वाहतुक करणारे व वाहतुक नियमांचे उल्लंघन करणाऱ्या २६८ वाहन चालका विरूध्द कार्यवाही करण्यात आली असुन त्यांचे कडुन १,७९,८००/— रूपये दंड वसुल करण्यात आला आहे.

**दारूबंदी सदराखाली विशेष मोहित अंतर्गत कार्यवाही :—**

मा.पोलीस अधीक्षक हिंगोली यांचे मार्गदर्शनाखाली हिंगोली जिल्हयामध्ये अवैध दारू विक्री अंतर्गत दि.२९/११/२०२२ रोजी दारूबंदी कायदया अंतर्गत हिंगोली जिल्हयामध्ये एकुण ०७ ठिकाणी छापा मारूण कार्यवाही करून आरोपीतां कडुन ७०.१४ लिटर दारू असा एकुण १४,४४०/—रू.किमतीचा अवैध दारूसाठा जप्त तसेच नाश करण्यात आला असुन आरोपीतां विरूध्द दारूबंदी कायदयाअंतर्गत गुन्हा दाखल करण्यात येवुन पुढील तपास करण्यात येत आहे.

**चोरी :—** दिनांक २९/११/२०२२ रोजी फिर्यादी क्रांतीकूमार देविदास चिंचोळकर वय ३९ वर्ष व्य.नौकरी उपकार्याकारी अभियंता,१३२ के.व्हि विदयुत उपकेंद्र हिंगोली,रा.सुधीर कॉलनी जवळ चतुर्भूज कॉलनी अकोली ता.जि अकोली ह.मु.पावर हाउस परीसर यशवंत नगर हिंगोली यांचे फिर्यादी वरून पोस्टे हिंगोंली शहर येथे कलम ३७९ भादवी प्रमाणे गुन्हा दाखल असुन यातील अज्ञात आरोपीने १३२ केव्हि विदयुत उपकेंद्र हिंगोली येथील साहित्य चोरून नेले आहे.म्हणुन गुन्हा दाखल होवुन या संदर्भात हिंगोलीशहर पोलीस तपास करित आहेत.

दिनांक २९/११/२०२२ रोजी फिर्यादी मल्हारी पुरभाजी शिंदे वय ७५ व्य.शेती रा आसोंदा ता औढा ना जि हिंगोली यांचे फिर्यादी वरून पोस्टे हिंगोली शहर येथे कलम ३७९ भादवी प्रमाणे गुन्हा दाखल असुन २९.११.२०२२ रोजीचे १२.३० वा चे सुमारास नांदेड नाका येथील ट्रेंडस कापड दुकाना जवळ पुर्वेस ५०० मिटर व १४.०० वा सु हिंगोली बसस्थानक जवळ रोड वर यातील अज्ञात ईसमानी फिर्यादीचे खिश्यातील ७००० रू नगदी तसेच शेख तोजोदीन शेख मुनीर यांचे खिश्यातील १०,००० रू नगदी असे एकुण १७००० रू नगदी चोरले म्हणुन गुन्हा दाखल होवुन या संदर्भात हिंगोली शहर पोलीस तपास करित आहेत.

**मरणास कारणीभुत असणा—या विरूध्द अपराध दाखल व अपघात गुन्हे:—**

दिनांक २९/११/२०२२ रोजी पोस्टे कळमनुरी येथे कलम २७९,३०४(अ) भादवी अन्वये गुन्हा दाखल असुन आयशर ट्रक क्रमांक एम.पी. ११/टी.आर.बी.एच—४६६१चा चालकाने त्याचे ताब्यातील आयशर क्र ट्रक हा निष्काळजीपणे भरधाव वेगात चालुवन मयत यास जोराची धडक दिली असुन त्यामध्ये त्याच्या डोक्याला व इतर ठिकाणी मार लागुन त्याचे मरणास कारणीभुत झाल्याने याचेवर गुन्हा दाखल होवुन या संदर्भात कळमनुरी पोलीस तपास करित आहेत

दि.२९.११.२०२२ रोजी पोस्टे कळमनुरी येथे २७९,३३७,३३८ भादवी अन्वये गुन्हा दाखल असुन ॲटो क्र एमएच ३८ २०९८ चा चालक याने त्याचे ताब्यातील ॲटो भरधाव व निष्काळजीपणे चालवुन फिर्यादीस जोराची धडक मारली आहे त्यामुळे फिर्यादीस गंभीर मार लागुन डावा पाय फॅक्चर झाला व मुक्कामार लागला आहे म्हणुन गुन्हा दाखल होवुन या संदर्भात कळमनुरी पोलीस तपास करित आहेत.

**अवैध वाहतुक करणारे व वाहतुक नियमांचे उल्लंघन करणारे वाहन चालकावर कार्यवाही :—**

मा.पोलीस अधीक्षक हिंगोली यांचे मार्गदर्शनाखाली हिंगोली जिल्हयात दि २९/११/२०२२ रोजी अवैध वाहतुक करणारे व वाहतुक नियमांचे उल्लंघन करणाऱ्या वाहन चालकाविरूध्द २८३ मोवाका अन्वये एकुण ०९ ठिकाणी कार्यवाही करण्यात आली.